**विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन परिपत्रक दि.२७ जुलै, २०१५ तील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१७/प्र.क्र.१७१/१८(र.व का.)**

हुतात्मा चौक,मादाम कामा मार्ग,

मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

दिनांक: २७ ऑक्टोबर, २०१७

**वाचा -शासन परिपत्रक क्रमांकः विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८(र.व का.),दि.२७ जुलै, २०१५**

**शासन परिपत्रक**

विधानमंडळ/ संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देणे, त्यांचेकडून आलेल्या पत्र/अर्ज/निवेदनांना विहित मुदतीत पोच देणे व त्याअनुषंगाने सत्वर कार्यवाही करणे इ.संदर्भात शासन परिपत्रक दि.२७ जुलै, २०१५ अन्वये सर्वंकष मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि सदर मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, असे निदर्शनास आले आहे. सबब सदर परिपत्रकातील सूचनांचे पालन सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेकडून केले जावे, यासाठी पुढीलप्रमाणे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत.:-

१. उपरोक्त परिपत्रकातील परिच्छेद क्र.५ अन्वये विधानमंडळ/संसद सदस्य यांचेकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांकरिता प्रत्येक कार्यालयात विहित नमुन्यात स्वतंत्र नोंदवही/संगणकीय नोंदी ठेवणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक कार्यालयाने उचित कार्यवाही करावी.

२. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारासंदर्भात उक्त परिपत्रकातील परिच्छेद ६ ( i ) अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुख/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी दर तीन महिन्यांनी आढावा घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

३. ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या पत्रांना विहित मुदतीत पोच, माहिती अथवा अंतिम उत्तर दिले नाही. तसेच लोकप्रतिनिधींच्या पत्रव्यवहारासाठी विहित नमुन्यात नोंदवही ठेवली नाही त्यांची गंभीर दखल घेऊन संबंधित सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी संबंधितांविरुध्द उक्त परिपत्रकातील तरतुदीनुसार शिस्तभंगांची कारवाई करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०३०१२३३५०५७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=57dd6ec1681532b63c78bdc2d0f79ab4b9efccc6814de3df1f59d557777b3c45, cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2017.10.30 12:23:05 +05'30'

**(भगवान सहाय)**

अपर मुख्य सचिव,(प्र.सु.,र.व का.)

**प्रति,**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव (५ प्रती),
६. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
७. मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,
८. मा.महाअधिवक्ता,महाराष्ट्र राज्य
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती),
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (२ प्रती),
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१८. सर्व मंत्रालयीन विभाग
१९. सर्व विभागीय आयुक्त,
२०. सर्व जिल्हाधिकारी,
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२२. मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२३. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२४. निवड नस्ती.(कार्यासन-१८)